Registered No. B. 10

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 21st JULY 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

खालीं दिलेला मसुदा आणि त्या सोबतचें हेतु व कारणें यांचें निरूपण हीं, आलीजा मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाच्या सभांच्या वेळीं काम चालविण्याबाबतच्या कानूंपैकीं २२ व्या कानूअन्वयें प्रसिद्ध केलीं आहेत :—

### सन १८९८ चा मसुदा नंबर ३.

ज्या अर्थीं तुपांत व मनुष्याच्या खाण्याच्या इतर पदार्थांत भेळ घालण्याची मनाई करण्यासाठीं मुंबई शहरांत व इतर ठिकाणीं जास्त चांगली तजवीज करणें योग्य आहे; त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) या आक्टास "सन १८९८ चा मुंबईचा भेळ घालण्याची मनाई करण्याबाबत आक्ट" असें ह्मणावें. — लहान सरनामा.

(२) तो मुंबई शहरांत लागलाच अमलांत येईल. — सुरवात व व्याप्ति.

(३) गव्हर्नर इन् कौन्सिल यांस, जाहिरनामा प्रसिद्ध करून, त्याचे सर्व किंवा कोणतेहि ठराव, अशा जाहिरनाम्याच्या तारखेनंतर एक महिन्याहून कमी नाहीं अशा दिवशीं किंवा त्या दिवसानंतर, मुंबई इलाक्यांतील कोणत्याहि म्युनिसिपल डिस्ट्रिक्टास लागू करण्याचा अख़्त्यार आहे.

तसेंच, ह्या आक्टाच्या ठरावांस अनुसरून, असा जाहिरनामा रद्द करण्याचा अगर त्यांत फेरफार करण्याचा त्यांस अख़्त्यार आहे.

२. (१) विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर, या आक्टांत वापरलेल्या सर्व शब्दांचे अर्थ, सन १८८८ चा मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट यांत जे अर्थ दिले आहेत, तेच आहेत असें समजावें. — अर्थ.

(२) या आक्टाचा मुंबई शहराशीं संबंध असेल तेथवर तो, सन १८८८ चा मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट याशीं मिळून वाचावा, आणि मुंबई इलाक्याच्या इतर कोणत्याहि भागाशीं त्याचा संबंध असेल तेथवर तो, सन १८७३ व १८८४ चे मुंबईचे डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट यांशीं मिळून वाचावा. — हा आक्ट, अमलांत असलेल्या म्युनिसिपल आक्टांशीं मिळून वाचावा.

योग्य स्वरूपाचा, सत्वाचा किंवा प्रतीचा नाहीं असा मनुष्याच्या खाण्याचा पदार्थ विकण्याबद्दल शिक्षा.

३. (१) जो कोणी, विकत घेणाराचें नुकसान होईल अशा रीतीनें, अशा विकत घेणारानें मागितलेल्या स्वरूपाचा, सत्वाचा किंवा प्रतीचा नाहीं असा मनुष्याच्या खाण्याचा कोणताहि पदार्थ विकील त्याला पहिल्या अपराधाबद्दल पराकाष्ठा शंभर रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल आणि दुसऱ्यानदा केलेल्या किंवा त्यांनंतरच्या कोणत्याहि अपराधाबद्दल पराकाष्ठा तीन महिनेपर्यंत कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा पांचशें रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल अगर दोन्ही शिक्षा होतील.

(२) जर, तूप मागण्यांत येईल तेव्हां सर्वांशीं दुधापासूनच निपजलेला नाहीं असा कोणताहि जिन्नस ज्यांत असेल तसा कोणताहि पदार्थ देण्यांत येईल, तर असा पदार्थ विकण्यापूर्वी विकणारानें, त्यांत सदरहू जिन्नस असल्याची गोष्ट विकत घेणारास जाणविली नसल्यास, तो पदार्थ पोट-कलम (१) च्या अर्थाप्रमाणें, विकत घेणाराचें नुकसान होई अशा रीतीनें विकण्यांत आला असें मानलें पाहिजे.

(३) पोट-कलम (२) च्या ठरावांस पात्र करून, खालीं सांगितलेल्या बाबतींत कोणताहि अपराध या कलमाअन्वयें केला आहे असें मानूं नये; ह्मणजे :—

(अ) जेव्हां, आरोग्यास अपायकारक नाहीं अशी कोणतीहि वस्तु किंवा द्रव्य एकाद्या खाण्याच्या पदार्थांत, तो पदार्थ व्यापाराचा पदार्थ ह्मणून नेण्यास किंवा खपास योग्य अशा स्थितींत निपजण्यासाठीं किंवा तयार करण्यासाठीं ती वस्तु किंवा तें द्रव्य अवश्य असल्याच्या कारणानें मिळविलें असून, कपटानें तो खाण्याचा पदार्थ, त्याचें वजन किंवा माप जास्त वाढविण्यासाठीं किंवा त्याची हलकी प्रत छपविण्यासाठीं मिळविलें नसेल तेव्हां,

(ब) जेव्हां, असा खाण्याचा पदार्थ निपजण्याची, तयार करण्याची किंवा नेण्याची क्रिया चालत असतां त्या पदार्थाशीं कोणती तरी बाहेरची वस्तु कांहीं अपरिहार्य कारणामुळें मिश्रित झाली असेल तेव्हां.

(४) या कलमाअन्वयें चालविलेल्या कोणत्याहि फौजदारी खटल्यांत, विकणारास त्यानें विकलेल्या पदार्थाचें स्वरूप, सत्व किंवा प्रत माहीत नव्हती असें ह्मणणें, किंवा विकत घेणारानें तो पदार्थ फक्त पृथक्करणासाठींच विकत घेतला असल्यामुळें त्या विक्रीनें त्याचें कांहीं नुकसान झालेलें नाहीं असें ह्मणणें हा बचाव होणार नाहीं.

मात्र असें ठरविलें आहे कीं जर विकणारा कोर्टाची खात्री होईल अशा रीतीनें खालीं सांगितल्याप्रमाणें शाबित करील तर त्यानें या कलमाअन्वयें अपराध केला आहे असें मानूं नये, ह्मणजे—

(अ) विकलेला पदार्थ, विकत घेणारानें ज्या स्वरूपाचा, सत्वाचा व प्रतीचा मागितला त्याच स्वरूपाचा, सत्वाचा व प्रतीचा तो आपण विकत घेतला असून तो त्याच स्वरूपाचा, सत्वाचा व प्रतीचा होता असा मजकुराची लेखी खात्री आपण घेतली होती,

(ब) ज्या वेळीं तो आपण विकला त्या वेळीं तो पदार्थ सदरीं सांगितल्या स्वरूपाचा, सत्वाचा व प्रतीचा नव्हता असें मानण्यास आपणाला कारण नव्हतें, आणि

(क) ज्या स्थितींत तो आपण विकत घेतला त्याच स्थितींत तो आपण विकला.

(५) जर, मुंबई शहरांत कमिशनर किंवा त्यानें त्या बाबतींत ज्या कोणत्याहि अमलदारास अधिकार दिला असेल तो अमलदार, आणि इतर ठिकाणीं ज्या अमलदारास तेथील म्युनिसिपालिटीनें सन १८७३ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट याच्या ६८ व्या कलमाअन्वयें काम करण्याचा अधिकार दिला असेल तो अमलदार

विक्रीसाठीं मांडलेला खाण्याचा कोणताहि पदार्थ विकत घेऊं मागेल, आणि पृथक्करणाच्या कारणासाठीं वाजवी रीतीनें जरूर असेल त्याहून ज्यास्त नाहीं इतक्या त्या पदार्थाची किंमत देऊं काढील, व ज्या मनुष्यानें तो विक्रीसाठीं मांडला असेल तो मनुष्य तो विकीत नाहीं ह्मणेल, तर असा मनुष्य पराकाष्ठा पन्नास रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

सन १८८८ चा मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट, कलम ४१७ यांत मजकूर वाढविला आहे असें समजावें.

४. (१) या आक्टाच्या कारणांसाठीं व तो मुंबई शहरास लागू असेल तेवढ्या पुरतें, सन १८८८ चा मुंबई शहरच्यां म्युनिसिपालिटीबाबत आक्ट यांच्या ४१७ व्या कलमाच्या शेवटीं खालीं दिलेले शब्द जास्त दाखल केले आहेत असें समजावें, ह्मणजेः—

"आणि मालकास, किंवा केवळ हुंडेकरी अगर निक्षेपी नव्हे अशा ज्या मनुष्याच्या कबज्यांत तो सांपडला असेल त्या मनुष्यास, पराकाष्ठा शंभर रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल.

सन १८७३ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट, कलम ६८ यांत मजकूर वाढविला आहे असें समजावें.

(२) या आक्टाच्या कारणांसाठीं व ज्या कोणत्याहि म्युनिसिपल डिस्ट्रिक्टास त्याचे ठराव १ ल्या कलमाच्या (३) ऱ्या रकमेअन्वयें लागू करण्यांत येतील त्या म्युनिसिपल डिस्ट्रिक्टास तो लागू असेल तेवढ्या पुरतें, सन १८७३ च्या मुंबईच्या डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्टाचें ६८ वें कलम खालीं सांगितल्याप्रमाणें सुधारलें आहे असें समजावें, ह्मणजे :—

सदरहू ६८व्या कलमाच्या शेवटल्या ह्मणजे "आणि त्यांचा मालक" या शब्दांनीं आरंभ होऊन "शिक्षेस पात्र होईल" या शब्दांनीं संपणाऱ्या वाक्याच्या ऐवजीं "आणि त्यांच्या मालकास, किंवा केवळ हुंडेकरी अगर निक्षेपी नव्हे अशा ज्या मनुष्याच्या कबज्यांत ते सांपडले असतील त्या मनुष्यास, पराकाष्ठा शंभर रुपयेपर्यंत दंडाची शिक्षा होईल." हे शब्द दाखल करावे.

सन १८८८ च्या मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्टाच्या ४१५ व्या कलमाबरोबर वाचावयाचा खुलासा.

५. (१) या आक्टाच्या कारणांसाठीं आणि तो मुंबई शहरास लागू असेल तेवढ्या पुरता, सन १८८८ च्या मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्टाच्या ४१५ व्या कलमास खालीं दिलेला खुलासा जोडला आहे असें समजावें, ह्मणजे :—

"**खुलासा**.—तूप ह्मणून विक्रीसाठीं वर सांगितल्याप्रमाणें मांडलेल्या, घरोघर नेण्यांत येत असलेल्या किंवा कोणत्याहि जागेंत ठेवलेल्या अगर आणलेल्या ज्या कोणत्याहि पदार्थांत सर्वांशीं दुधापासूनच निपजलेली नाहीं अशी कोणतीहि वस्तु असेल तो पदार्थ या कलमाच्या व ४१७ व्या कलमाच्या कारणांसाठीं, तो जसा आहे ह्मणून सांगण्यांत आलें असेल तसा नाहीं असें मानलें पाहिजे."

सन १८७३च्या मुंबईच्या डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्टाच्या ६८ व्या कलमाबरोबर वाचावयाचा खुलासा.

(२) या आक्टाच्या कारणांसाठीं, व ज्या कोणत्याहि म्युनिसिपल डिस्ट्रिक्टास त्याचे ठराव १ ल्या कलमाच्या (३) ऱ्या रकमेअन्वयें लागू करण्यांत येतील त्या म्युनिसिपल डिस्ट्रिक्टास तो लागू असेल तेवढ्या पुरता, या आक्टाचें कलम ४ (२) यावरून सुधारलेल्या सन १८७३ च्या मुंबईच्या डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्टाच्या ६८ व्या कलमास आणखी खालीं दिलेला खुलासा जोडला आहे असें समजावें, ह्मणजे:—

"**खुलासा**.—तूप ह्मणून विक्रीसाठीं वर सांगितल्याप्रमाणें मांडलेल्या, भरून ठेवलेल्या किंवा कोणत्याहि जागेस आणलेल्या ज्या कोणत्याहि पदार्थांत सर्वांशीं दुधापासूनच निघालेली नाहीं अशी कोणतीहि वस्तु असेल तो पदार्थ या कलमाच्या कारणांसाठीं खाण्यास किंवा पिण्यास अयोग्य आहे असें मानलें पाहिजे, आणि असें ठरविलें आहे कीं सदरहू पदार्थ हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या २७३ व्या कलमाच्या अर्थाप्रमाणें खाण्यास किंवा पिण्यास अयोग्य आहे असें आढळून आल्यास, त्याचा मालक किंवा सदरीं सांगितल्या प्रकारच्या ज्या मनुष्याच्या कबज्यांत तो सांपडला असेल तो मनुष्य आणखी, सदरहू कलमांत ठरविलेल्या शिक्षेस पात्र होईल."

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

तुपांत जनावराची चरबी मिसळून भेळ करणें हा एक व्यापारच बनत चालला आहे अशी भीति बाळगण्यास कारण झालें आहे. या इलाक्यांतील ज्या लोकांत तुपाचा खप होतो त्यांपैकीं बहुतेकांस तुपांत चरबीची भेळ घातलेली असणें ही गोष्ट, केवळ आरोग्यास अपायकारक अशीं द्रव्यें त्यांत घातलेलीं असण्यापेक्षांही जास्त कंटाळवाणी आहे.

याप्रमाणें भेळ घातलेलें तूप लोकांस विकण्यांत येऊं नये या विशेष हेतूनें हा हल्लींचा मसुदा तयार केला आहे.

२. सदर्हू मसुदा मुंबईचा म्युनिसिपालिटींच्या नोकरांबाबत आक्ट नामक सन १८९० च्या ९ व्या आक्टाच्या मोडणीवर तयार केला आहे, कारण सन१८८८ चा मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्ट किंवा सन १८७३ व १८८४ चे डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट सुधारण्यापेक्षां त्यांतील विशेष ठराव एकत्र करून एक निराळाच आक्ट करणें हें, ज्यास्त पसंत वाटतें. या कायद्याची गरज विशेषेंकरून हल्लीं मुंबई शहरांत वाटत असल्यामुळें सदर्हू मसुद्यांत असा ठराव केला आहे कीं तो मुंबई शहरांत एकदम अमलांत येईल. तसेंच, मुंबई इलाक्यांतील कोणत्याहि म्युनिसिपल डिस्ट्रिक्टास या कायद्याचे विशेष ठराव गव्हर्नर इन् कौन्सिल यांनीं लागू करण्याच्या संबंधानें एक रकम दाखल केली आहे.

मुंबई शहरचा म्युनिसिपालिटीबाबत आक्ट व डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट यांच्यामध्यें जो फरक असणें अवश्य आहे तो या सगळ्या मसुद्यांत कायम ठेविला आहे. यास्तव हा कायदा जरूर पडेल तेव्हां कांहीं अडचण न पडतां डिस्ट्रिक्ट म्युनिसिपालिटींस लागू करतां येईल.

३. कलम ३ यांत, योग्य स्वरूपाचे, सत्वाचे किंवा प्रतीचे नाहींत असे खाण्याचे पदार्थ विकण्याची मनाई करण्यासाठीं, व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या ३८ व्या व ३९ व्या वर्षांतील च्यापूटर ४९, कलम ६. याच्या मोडणीवर तयार केलेला कायद्याचा एक नवीन ठराव दाखल केला आहे आणि त्यांत, अशा प्रकारचा अपराध केल्याची दुसऱ्यानदा किंवा त्यानंतर शाबिती झाली असतां जास्त शिक्षा करण्याबद्दल ठरविलें आहे.

पोट-कलम (२) अन्वयें सदर्हू शिक्षा, सर्वांशीं दुधापासूनच निपजलेली नाहीं अशी जी कोणतीहि वस्तु तूप ह्मणून विकण्यांत येईल तिच्या स्वरूपाविषयीं विकणारानें विकतघेणारास कळविलें नाहीं तर त्या विक्रीच्या बाबतींत लागू होईल.

या कलमाच्या ३ ऱ्या पोट-कलमांतील विशेष ठराव, व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीच्या ४२ व ४३ व्या वर्षांतील च्यापूटर ३०, कलम २, यांतून घेतला आहे.

त्याच कलमाच्या (४) थ्या पोट-कलमांत, त्या कलमाअन्वयें फौजदारी खटला चालला असतां त्यांत विकणारानें विकलेल्या पदार्थाचें स्वरूप, प्रत किंवा सत्व त्यास माहीत नव्हतें असें ह्मटल्यानें, किंवा विकत घेणारानें फक्त पृथक्करणाच्याच कारणासाठीं विकत घेतला असल्यामुळें त्याचें नुकसान झालेलें नाहीं असें सांगितल्यानें त्याचा बचाव होत नाहीं असा जो ठराव आहे त्या ठरावाच्या संबंधानें तें पोट-कलम, सन १८८८ च्या बंगालच्या २ ऱ्या आक्टाच्या ३६४ व्या कलमास अनुसरून केलें आहे.

तथापि (४) थ्या पोट-कलमास एक विशेष ठराव जोडला असून त्यांत, विकणारास ठरविलेल्या शिक्षांपासून आपलें संरक्षण कोणत्या प्रसंगीं करितां येईल तें ठरविलें आहे. हा विशेष ठराव, सन १८९६ च्या १८ व्या आक्टावरून सन १८९१ चा पंजाबचा म्युनिसिपल आक्ट २० वा यांत जी एक सुधारणा केली आहे तिला अनुसरून केला आहे.

पृथक्करणाच्या कारणासाठीं मागितलेला कोणताही पदार्थ वाजवी किंमतीस विकण्यास नाकारल्यास त्या बाबतींत रु. ५० दंड होईल असा जो आणखी विशेष ठराव त्याच कलमाच्या (५) व्या पोट-कलमांत दाखल केला आहे तो दाखल करणें जरूर वाटलें आहे.

हा ठराव, बंगालचा सन १८७६ चा ४ था व सन १८८४चा ३ रा या आक्टांमध्यें, सन १८८६ च्या बंगालच्या ३ ऱ्या आक्टाचें कलम ३-ड यावरून जें कलम दाखल केलें आहे त्या कलमासारखाच आहे.

४. कलम ४ यांत, अनुक्रमें सन १८८८ च्या मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्टाच्या ४१७ व्या कलमांत आणि सन १८७३ च्या मुंबईच्या डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्टाच्या ६८ व्या कलमांत जो ज्यास्त मजकूर वाढवावा असें

वाटलें आहे त्या मजकुरावरून, त्या त्या कलमांअन्वयें धरलीं जाण्यास पात्र असणारीं जनावरें किंवा खाण्याचे पदार्थ, केवळ हुंडेकरी किंवा निगा राखणारा मनुष्य याव्यतिरिक्त, ज्या इतर कोणत्याहि मनुष्याच्या कबज्यांत सांपडतील त्या मनुष्यास रु. १०० पर्यंत दंडाची शिक्षा करण्याचा अधिकार देण्याचें योजिलें आहे.

९. कलम ९ यांत, अनुक्रमें मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्टाच्या ४१९ व्या कलमास आणि सन १८७३ च्या डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्टाच्या (या मसुद्याच्या ४ थ्या कलमावरून सुधारलें आहे त्याप्रमाणें वाचावयाच्या) ६८ व्या कलमास जो खुलासा जोडावा असें वाटलें आहे त्या खुलाशावरून, सर्वांशीं दुधापासूनच निपजलेली नाहीं अशी कोणतीहि वस्तु तूप ह्मणून विकण्यासाठीं मांडली, घरोघर नेण्यांत आली, ठेविली किंवा कोणत्याहि जागेंत आणली तर, ती (मुंबई शहरच्या म्युनिसिपालिटीबाबत आक्टाच्या ४१९ व्या व ४१७ व्या कलमांचा संबंध असेल तेथवर), ती जशी आहे ह्मणून सांगण्यांत आलें असेल तशी नाहीं असें ठरविण्याचें, आणि ती तशी नाहीं असें समजून तिची त्या कलमांप्रमाणें व्यवस्था करण्याचें योजिलें आहे.

शिवाय, तूप ह्मणून सदरहूप्रमाणें मांडलेली, घरोघर नेण्यांत आलेली वगैरे सदरहू प्रकारची वस्तु (डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्टाच्या ६८ व्या कलमाचा संबंध असेल तेथवर) त्या कलमाच्या अर्थाप्रमाणें खाण्यास किंवा पिण्यास अयोग्य आहे असें मानलें पाहिजे.

(सही) ए. एस्. मोरियार्टी.

तारीख १९ माहे जून सन १८९८.

आलीजा नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) सी. जी. एच्. फॉसेट,

मुंबईचे गव्हर्नर यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाचे सेक्रेटरी.

मुक्काम बंदिरे मुंबई, तारीख १६ माहे जून, सन १८९८.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

# Bombay Act No. I of 1898.

## मुंबई सरकार.

मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजाह गव्हर्नरसाहेब यांनीं तारीख १९ माहे फेब्रुआरी सन १८९८ रोजीं, आणि आली जनाब व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ३ माहे मे सन १८९८ रोजीं मंजूर केला, तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

## सन १८९८ चा मुंबईचा आक्ट १ ला.

### सन १८८८ च्या मुंबई शहर म्युनिसिपालिटीच्या आक्टांत सिंकिंग फंड व फाजील पैसा व्याजीं लावण्याबाबद ठराव आहेत त्यांची पुरवणी करण्याविषयीं आणि कित्येक डिबेंचर कायदेशीर ठरविण्याविषयीं आक्ट.

( या आक्टास हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल यांनीं दिलेली मंजुरी मुंबईचे गव्हर्नर यांनीं तारीख ३ माहे जून सन १८९८ रोजीं प्रसिद्ध केली. )

ज्याअर्थीं सन १८८८ च्या मुंबई शहर म्युनिसिपालिटीच्या आक्टांत मुंबई शहर म्युनिसिपालिटीच्या कार्पोरेशनचे सिंकिंग फंड व फाजील पैसा पब्लिक सिक्यूरिटींमध्यें व्याजीं लावण्याबाबद ठराव आहेत त्यांची पुरवणी करणें योग्य आहे ; आणि तसेंच ज्याअर्थीं सदरहू कार्पोरेशनच्या सिंकिंग फंडांपैकीं व फाजील पैशापैकीं कांहीं भाग त्या कार्पोरेशनच्या ज्या कित्येक डिबेंचरांमध्यें आजपर्यंत व्याजीं लावले आहेत असें दिसतें त्या डिबेंचरांच्या कायदेशीरपणाविषयीं उपस्थित झालेले संशय दूर करणें, आणि याप्रमाणें व्याजीं लावलेल्या कोणत्याही ऐवजाच्या संबंधानें सदरहू कार्पोरेशनच्या नांवीं, किंवा त्या कार्पोरेशनच्या वतीनें मुंबई शहरच्या म्युनिसिपल कमिशनरच्या नांवीं त्या कार्पोरेशनचे जे डिबेंचर काढलेले असतील किंवा यानंतर काढण्यांत येतील किंवा जे त्या कार्पोरेशनच्या किंवा त्याच्या वतीनें त्या कमिशनरच्या नांवावर तबदील करून दिलेले असतील किंवा यानंतर देण्यांत येतील ते डिबेंचर बुडूं न देणें योग्य आहे ;

त्याअर्थीं यावरून खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. या आक्टास, "सन १८९८ चा मुंबई शहर म्युनिसिपालिटीचा ऐवज व्याजीं लावण्याबाबद आक्ट," असें ह्मणावें.

२. (१) जें कोणतेंही सिंकिंग फंड पब्लिक सिक्युरिटींमध्यें व्याजीं लावण्याविषयीं सदरहू कार्पोरेशनास सन १८८८ च्या मुंबई शहर म्युनिसिपालिटीच्या आक्टांत फर्माविलें आहे किंवा अधिकार दिला आहे त्या फंडांच्या संबधानें, आणि जो कोणताही फाजील पैसा तशाच सिक्यूरिटींमध्यें व्याजीं लावण्याविषयीं सदरहू कार्पोरेशनच्या वतीनें सदरहू म्युनिसिपल कमिशनरास, त्याच (सन १८९३ चा मुंबई शहर म्युनिसिपालिटीचा आक्ट सुधारण्याबाबद आक्ट यावरून सुधारलेल्या) आक्टांत अधिकार दिला आहे त्या पैशाच्या संबंधानें, कार्पोरेशननें खालील प्रकारचे कोणतेही डिबेंचर, ह्मणजे जें कोणतेंही लोन काढण्याकरितां सन १८८८ च्या मुंबई शहर म्युनिसिपालिटीच्या आक्टाच्या १०६व्या कलमाअन्वयें हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची मंजुरी योग्य रीतीनें मिळविण्यांत येईल त्या लोनाबद्दल काढावयाचें कोणतेंही डिबेंचर, सदरील प्रकारचा कोणताही ऐवज व्याजीं लावण्याच्या कारणां-करितां निराळे राखून ठेवणें कायदेशीर होईल, मात्र असे डिबेंचर याप्रमाणें निराळे राखून ठेवण्याचा इरादा सदरहू लोन काढण्याच्या शर्तींदाखल जाहीर केला पाहिजे.

(२) असे कोणतेंही डिबेंचर, सदरहू कार्पोरेशनच्यावतीनें परभारें "मुंबई शहरचा म्युनिसिपल कमिशनर" याच्या नांवावर व नांवीं काढल्यानें, ते बुडतील किंवा रद्द होतील असें नाहीं, तर याप्रमाणें काढलेला दरेक डिबेंचर दुसऱ्या कोणत्याही मनुष्याच्या नांवावर व नांवीं काढलेला असल्याप्रमाणें सर्वप्रकारें कायदेशीर होईल.

३. सदरहू कार्पोरेशननें काढलेला कोणताही डिबेंचर त्या कार्पोरेशननें किंवा त्याच्यावतीनें सदरहू म्युनिसिपल कमिशनरनें खरेदी केल्यानें, किंवा त्या कार्पोरेशनकडे किंवा त्याच्यावतीनें त्या कमिशनरकडे तो तबदील करून, सोंपून किंवा शेरा लिहून दिल्यानें, असा कोणताही डिबेंचर बुडेल किंवा रद्द होईल असें नाहीं, तर तो दुसऱ्या कोणत्याही मनुष्यानें धारण केला असता किंवा त्याकडे तो तबदील करून, सोंपून किंवा शेरा लिहून दिला असता तर तो ज्या रीतीनें व जितक्या अंशीं कायदेशीर व वेचनी झाला असता त्याच रीतीनें व तितक्याच अंशीं तो कायदेशीर व वेचनी होईल.

४. सदरहू कार्पोरेशनच्या नांवीं, किंवा त्याच्यावतीनें सदरहू म्युनिसिपल कमिशनरच्या नांवीं आजपर्यंत काढलेले, किंवा तबदील करून, सोंपून किंवा शेरा लिहून दिलेले, त्या कार्पोरेशनचे, अ परिशिष्टांत नमूद केलेले, सर्व निरनिराळे डिबेंचर, आणि सदरहू डिबेंचरांपैकीं कोणतेही डिबेंचर पुनः करून देण्याच्या, एकत्र करण्याच्या किंवा एका-ऐवजीं अनेक करण्याच्या कारणानें, आजपर्यंत काढलेले सर्व डिबेंचर, सेक्रेटरी आफ् स्टेट यांपासून किंवा दुसऱ्या कोणत्याही मनुष्यापासून कर्जा घेतलेल्या पैशाबद्दल ते काढले असते तर ज्या बाबतींमध्यें व ज्या रीतीनें ते कायदेशीर व वेचनी झाले असते त्या सर्व बाबतींत व त्याच रीतीनें कायदेशीर व वेचनी होतील. आणि ते नेहेमी झालेले आहेत, असें समजलें पाहिजे.

५. सदरहू कार्पोरेशनच्या नांवीं किंवा त्याच्यावतीनें मुंबई शहरच्या म्युनिसिपल कमिशनरच्या नांवीं अस-णाऱ्या कोणत्याही डिबेंचराच्या तबदिलीवर त्या त्या वेळीं अशा म्युनिसिपल कमिशनरच्या हुद्यावर असणाऱ्या मनुष्यानें केलेली सही, असा मनुष्य तो डिबेंचर सदरहू कार्पोरेशनच्या किंवा सदरीं सांगितल्याप्रमाणें सदरहू म्युनिसिपल कमिशनरच्या नांवावर काढतेवेळीं किंवा तबदील करून, सोंपून किंवा शेरा लिहून देतेवेळीं सदरहू हुद्यावर नव्हता असें असलें तथापि, कायदेशीर व पुरती होईल.

## परिशिष्ट अ.

| लोनांचा तपशील व डिबेंचरांचे नंबर. | संख्या. | रकम. | एकूण. | कुल एकूण. |
|---|---|---|---|---|
| | | रु. | रु. | रु. |
| गटराचीं [ ड्रेनेजचीं ] व पाण्याचीं कामें, मार्किटें व रस्ते यांबद्दल मुंबई म्युनिसिपालिटीचें दरशेंकडा ५ टक्केप्रमाणें लोन (रु. १०,०८,५००) | | | | |
| नंबर ४४५ ते ७२९ ... ... ... | २८५ | ५०० | १,४२,५०० | |
| ,, ७३० ते ७४१ ... ... ... | १२ | ५०० | ६,००० | |
| | | | | १,४८,५०० |
| आग्रिपाडा येथील घरांस घाणीच्या पाण्याचे नळ जोडण्याबद्दल दरशेंकडा ५ टक्केप्रमाणें लोन (रु. २,४८,०००). | | | | |
| नंबर १ ते १७०... ... ... ... | १७० | ५०० | ८५,००० | |
| ,, १७१ ते १८२... ... ... ... | १२ | ५०० | ६,००० | |
| ,, १८३ ते १८८... ... ... ... | ६ | ५०० | ३,००० | |
| ,, ४८५ ते ४९२... ... ... ... | ८ | ५०० | ४,००० | |
| ,, ४९३ ते ४९६ .. ... ... ... | ४ | ५०० | २,००० | |
| | | | | १,००,००० |
| आरोग्यरक्षणासंबंधी अनेक कामांबद्दल (५ टक्केप्रमाणें) ३९ लाखांचें लोन. | | | | |
| नंबर ६८०१ ते ६८२५ ... ... ... | २५ | ५०० | १२,५०० | |
| ,, ६८२६ ते ६८७६ ... ... .. | ५१ | ५०० | २५,५०० | |
| ,, ६८७७ ते ६८८८ ... ... ... | १२ | ५०० | ६,००० | |
| ,, ६८८९ ते ६८९४ ... ... ... | ६ | ५०० | ३,००० | |
| ,, ६८९५ ते ६९०२ ... ... ... | ८ | ५०० | ४,००० | |
| ,, ६९०३ ते ६९६७ ... ... ... | ६५ | ५०० | ३२,५०० | |
| ,, ६९६८ ते ६९९२ ... .. ... | २५ | ५०० | १२,५०० | |
| ,, ६९९३ ते ७००० ... ... ... | ८ | ५०० | ४,००० | |
| | | | | १,००,००० |
| टान्साच्या पाण्याच्या कामाबद्दल दरशेंकडा ५ टक्केप्रमाणें लोन (रु. १४७ लाख). | | | | |
| नंबर २४४०१/२४४५० ते २९३५१/२५४०० | २० | २५,००० | ५,००,००० | |
| ,, २५४०१/२५४४० ते २६२०१/२६२४० | २१ | २०,००० | ४,२०,००० | |
| ,, २६२४१/२६२७० ते २७२६१/२७२९० | ३५ | १५,००० | ५,२५,००० | |
| ,, २७२९१/२७३१० ते २८२७१/२८२९० | ५० | १०,००० | ५,००,००० | |
| ,, २८२९१/२८३०० ते २८४८१/२८४९० | २० | ५,००० | १,००,००० | |
| ,, २८४९१/२८४९४ ते २८८८७/२८८९० | १०० | २,००० | २,००,००० | |
| ,, २८८९१/२८८९२ ते २९३२९/२९३३० | १७० | १,००० | १,७०,००० | |
| ,, २९३३१/२९३७० ते २९३५१/२९३९० | ४ | २०,००० | ८०,००० | |
| ,, २९३९१/२९३९२ व २९३९३/२९३९४ | २ | १,००० | २,००० | |
| ,, २९३९५/२९३९६ ते २९३९९/२९४०० | ३ | १,००० | ३,००० | |
| | | | | २५,००,००० |

| लोनांचा तपशील व डिबेंचरांचे नंबर. | संख्या. | रकम. | एकूण. | कुल एकूण. |
|---|---|---|---|---|
| | | रु. | रु. | रु. |
| म्युनिसिपालिटीच्या इमारतीबद्दल (५ टक्केप्रमाणें) लोन (रु. ८०,०००). | | | | |
| नंबर १/५० ते १९१/२००... ... ... | ४ | २५,००० | १,००,००० | |
| ,, २०१/२४० ते ३६१/४०० ... ... | ५ | २०,००० | १,००,००० | |
| ,, ४०१/४३० ते ५५१/५८० ... ... | ६ | १५,००० | ९०,००० | |
| ,, ५८१/६०० ते ९६१/९८० ... ... | २० | १०,००० | २,००,००० | |
| ,, ९८१/९९० ते ११७१/११८० ... ... | २० | ५,००० | १,००,००० | |
| ,, ११८१/११८४ ते १३७७/१३८० ... | ५० | २,००० | १,००,००० | |
| ,, १३८१/१३८२ ते १५९९/१६००... ... | ११० | १,००० | १,१०,००० | |
| | | | | ८,००,००० |
| ५ टक्केप्रमाणें काढलेल्या लोनाच्या डिबेंचरांची एकूण... | ... | ... | ... | ३६,४८,५०० |
| फायरब्रिगेड क्वार्टर व ठाणीं यांबद्दल ( ४ टक्केप्रमाणें ) ४½ लाखांचें लोन. | | | | |
| नंबर १/२० ते १८१/२०० ... ... ... | १० | १०,००० | १,००,००० | |
| ,, २०१/२१० ते २९१/३०० ... ... | १० | ५,००० | ५०,००० | |
| ,, ३०१/३०४ ते ४१७/४२० ... ... | ३० | २,००० | ६०,००० | |
| ,, ४२१/४२२ ते ४७९/४८० ... ... | ३० | १,००० | ३०,००० | |
| ,, ४८१ ते ५०० ... ... ... | २० | ५०० | १०,००० | |
| ४ टक्केप्रमाणें काढलेल्या लोनाच्या डिबेंचरांची एकूण... | ... | ... | ... | २,५०,००० |
| कुल एकूण ... | ... | ... | ... | ३८,९८,५०० |

आलीजाह नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादूर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

सी. जी. एच्. फॉसेट,

सेक्रेटरी निसबत मुंबईचे गव्हर्नर यांचें कायदेकानू करणारें कौन्सिल.

मुक्काम मुंबई, तारीख २ माहे जून सन १८९८.

(True translation.)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.